म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ६७५

१९४१

माहेर

REFBK-0006198
REFBK-0006198

~~२१९१~~
अं. १२०१

# मोहर

## काव्यसंग्रह

...री ग्रंथ संग्रहालय...

★ 卐 ★

# “मोहर”

काव्यसंग्रह

REFBK-0006198

कविः—ग. वि. ठेकेदार

— प्रथमावृत्ति —

किंमत आठ आणे

मुद्रक:—

रा. श्री. दिवाण

स्वस्तिक प्रिंटर्स लि., सोलापूर.

★ ★ ★

( द्वितीयावृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन )

★ ★ ★


प्रकाशक:—

रा. श्री. दिवाण

' स्वस्तिक प्रकाशन ' सोलापूर.



ठाणें.



का० ५
१२११

सौ० उषेस

# पदार्पण

महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे रौप्य महोत्सव अधिवेशनप्रसंगीं संमेलनाध्यक्ष श्री. वि. स. खांडेकर यांचे हातून प्रसिद्धी मिळण्याचा सुयोग ' मोहर ' या काव्य पुष्पाला लाभत आहे हें त्याचें महत्भाग्य होय.

सोलापूरच्या अनेक यशवंत साहित्यिकांत नाणावलेले कवि श्री. गं. वि. ठेकेदार यांनीं ' मोहर ' काव्य संग्रह प्रकाशित करण्याचे योजून आम्हांस प्रकाशन कार्यांत पदार्पण करावयास सुसंधी दिली याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवि श्री. गिरीश यांनीं ' मोहर ' ची प्रस्तावना लिहिण्याचें काम अत्यंत आपुलकीनें नि उत्साहानें केलें याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोंत.

सोलापूर शहरांतील व जिल्ह्यांतील तसेंच इतर ठिकाणच्या नवोदित व स्वतंत्रवृतीच्या लेखकांस त्यांच्या स्वतंत्रवृत्तीस बाध न आणतां आपलें ' साहित्य ' प्रकाशांत आणण्याची सुसंधि लाभावी अशा हेतूनेंच ' स्वस्तिक प्रकाशन ' नेहमीं प्रयत्न करीत राहील. याच दृष्टीनें श्री. गं. वि. ठेकेदार यांना आम्ही प्रोत्साहन देऊं शकलों.

सर्व नवोदित साहित्यिकांनीं ' स्वस्तिक प्रकाशनास ' उन्नतिपथायर नेण्याचें श्रेय घेतल्यास उत्तमोत्तम व अमोलिक

असें नाविन्यपूर्ण वाङ्मय निर्माण करून महाराष्ट्र शारदेची सेवा करण्याची संधि ' स्वास्तिक प्रकाशनास ' मिळेल यांत संशय नाहीं.

सर्व साधारणपणें मराठी वाङ्मय ' बिनामूल्य ' वाचण्याची खोड जोंपर्यंत फुकट्या वाचकांतून जाणार नाहीं तोंपर्यंत तें कधींच उत्कर्ष पावूं शकणार नाहीं. त्याचबरोबर हेंही खरें आहे कीं, न परवडतील अशा भारी किमतीचीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें सोडून देऊन अगदीं गरीब स्थितींतल्या वाचकांसही तीं घेतां येतील इतक्या स्वस्त किमतीस त्यांची विक्री झाल्यास मराठी वाङ्मय फार विस्तृत क्षेत्रांत पसरूं शकेल.

सर्व साधारण प्रकाशन संस्थांचा आणि साहित्यिकांचा असा समज आहे कीं, स्वस्त किमतीचें वाङ्मय कमी प्रतीचें समजलें जातें पण ही गोष्ट खोटी आहे हें परकीय वाङ्मयाच्या भरमसाट निर्मितीवरून सिद्ध होतें.

ह्याच दिशेनें ' स्वस्तिक ' प्रकाशन प्रयत्न करीत राहील. एवढें आश्वासन देऊन प्रिय वाचकांची रजा घेतों.

रा. श्री. दिवाण.

चालक

' स्वस्तिक प्रकाशन ' सोलापूर.

# रविकिरण

‘ काव्याला ओहोटी लागली आहे काय ? ’ या विषयावर गेल्या दहापांच वर्षांत अनेकवेळां चर्चा झाली, पण तीं शास्त्रशुद्ध झाली नाहीं. निर्मितीचा खरोखरीच आढावा घेऊन त्यावर आपले पुरावे कोणीहि आधारलेले नव्हते. त्यामुळें लोकांची दिशाभूल झाली. खरी परिस्थिती निराळी होती. १९२० नंतर ‘ रवि किरण मंडळ ’ व इतर नवोदित कवि यांनी नवा ध्येयवाद सुरू केला; नवीन प्रयोग, नवीन प्रवाह, नवीन रीति हें या काळचें प्रमुख लक्षण होतें. परंतु जीवनांत स्थित्यंतरें इतकीं झटपट होत होतीं, कीं कालचें आदर्श आजचें वास्तव होत होतें. त्यामुळें आदर्शांत वाटणारी गोडी वास्तवांत वाटेनाशी झाली. साहजिकच रसिकांचें लक्ष कादंबरी, लघुनिबंध, गुजगोष्टी इकडे वळलें व त्यांना काव्यनिर्मितीची दखलगिरी राहिली नाहीं. यावेळीं परिणतावस्थेला आलेले तांबे; माधव जूलियन, यशवंत, अनिल आदिकरून कवि व नवीन उदयास येणारे कवि आपापल्यापरी लेखन करीत होते, याची साक्ष तांब्याची कविता, स्वप्नरंजन,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

नकुलालंकार, यशोगंध, फलभार, जयमंगला, नंदादीप, वसंत-वैभव, मीठ भाकरी, भस्ममूर्ति, पत्री, मधुलहरी, काव्यकिरीट, सहवास वगैरे अनेक काव्यसंग्रह देतील. नवोदित कवींनीं भाषा, रचना, छन्दशास्त्र, काव्यशास्त्र यांचा अभ्यास केला असल्याचीं प्रत्यंतरेंहि या संग्रहांतून दिसतील. तरीहि ‘ काव्याला ओहोटी लागली आहे ’ ही ओरड चालू होतीच. साहाजिकच काव्याकडे दुर्लक्ष होऊं लागलें व थोडी फार चांगली कविता निर्माण होऊनहि तिची उपेक्षा होऊं लागली. नवीन निर्माण होणारे ‘ अंकुर ’ किंवा ‘ मोहोर ’ काळजी-पूर्वक जोपासले पाहिजेत, ही सहानुभूतीची वृत्ति कमी झाली. त्याबरोबर हेंहि थोडें खरें आहे कीं प्रत्यही नवीन जीवनाला लागणारा ध्येयवाद या काव्यांतून कमी प्रमाणांत मांडला गेला आणि कविता नीटनेटकी, ठाकठिकीची, बाळसे-दार निर्माण होऊनहि कवींना तीबद्दल आत्मविश्वास वाटेनासा झाला.

परंतु सूर्यकिरणाची दृष्टी दुसरीकडे वळली कीं ‘ मोहरा ’ची जशी वाढ खुंटते तसेंच कांहींसें नवोदित कवींच झालें. त्यांत भोवतालच्या विविध राजकीय आंदोलनांनीं ते भांबावून गेले व कोणतेंच एक सुनिश्चित ध्येय त्यांस दिसेना. पण समाजाच्या पुनर्घटनेसाठीं यापुढें तरी अशी फसगत होतां कामा नये. नवीन उदयाला येणारे अंकुर काळजीपूर्वक जोपा-सले पाहिजेत. म्हणजेच—

'आम्रांतील विकासिलीं न अजुनि बीजें रसज्ञा पुरी
प्रेमें तूं जरि राखशील पुढतीं लाभे खरी माधुरी

या विनंतीची सार्थकता झाल्यासारखें होईल.

काव्य निर्मितीची शक्ति समाजांत जिवंत आहे याची साक्ष प्रस्तुतचा ' मोहर ' हा काव्यसंग्रह देईल. प्रतिभा, अभ्यासुकपणा, निरीक्षण भावशीलता आणि कल्पकता यांची बीजें या ' मोहरांत ' दिसतील. या बीजांतून रसाळ आम्रफळें निर्माण होण्यासारखीं आहेत. उपेक्षेचें आभाळ किंवा अयोग्य टीकेचा झंझावात येऊन हा डंवरलेला ' मोहर ' गळून जाऊं नये व ' रवि किरणाचा चूर होतसे। मोहर सगळा गळुन जातसे ' असे म्हणण्याची पाळी येउं नये, अशी रसिकांना विनंती आहे. या मोहरांतील ' ओवाळणी ' ' मुके अश्रु ' ' श्रीमंत पतीची राणी ' ' रानफूल ' ' सुवर्ण भूमी ' ' हुतात्मे ' वगैरे कविता वानगीदाखल पुढें करतां येतील. रसिकांना या ' मोहराच्या ' परिमळास्वादानें खात्रीनें आनंद होईल.

९ एप्रील १९४१
सोलापूर

गिरीश

# अनुक्रम

| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | शारदा वंदन | ... | १ |
| २ | जिवाची ओळख | ... | ३ |
| ३ | अंतःपटा आडून | ... | ४ |
| ४ | सखीस | ... | ५ |
| ५ | रुष्ट सुंदरीस | ... | ७ |
| ६ | छकुलीचें चुंबन | ... | ८ |
| ७ | विवाहापूर्वी | ... | ९ |
| ८ | विवाहानंतर | ... | १० |
| ९ | मूक प्रेम | ... | १२ |
| १० | प्रेमले ! | ... | १३ |
| ११ | वेडी समजूत | ... | १४ |
| १२ | बाल मैत्रिणीस | ... | १५ |
| १३ | कुणाचा राग कुणावर तरी | ... | १६ |
| १४ | तिकडचें पत्र | ... | १७ |
| १५ | रंभा | ... | १९ |
| १६ | ओवाळणी | ... | २० |
| १७ | श्रीमंत पतीची राणी | ... | २१ |
| १८ | बाळ कुणाचें | ... | २२ |
| १९ | मुके अश्रू | ... | २३ |
| २० | चित्रकार | ... | २७ |
| २१ | मुरली | ... | २८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | कोळिष्टकांत अडकलेल्या भ्रमरास | ... | २९ |
| २३ | पाऊस | ... | ३० |
| २४ | कारभारी गेले गावा | ... | ३१ |
| २५ | रानफूल | ... | ३२ |
| २६ | पेरणी | .. | ३४ |
| २७ | धर्मवीरा | ... | ३५ |
| २८ | शिवाजीस | ... | ३६ |
| २९ | सुवर्ण भूमी | ... | ३७ |
| ३० | हुतात्मे | ... | ३९ |
| ३१ | भगव्या झेंड्यास | ... | ४१ |
| ३२ | आमची संस्कृती | ... | ४२ |
| ३३ | शेतकरी | ... | ४४ |
| ३४ | धन आणि चिंता | ... | ४५ |
| ३५ | द्रव्याविण | ... | ४६ |
| ३६ | संपादकास | ... | ४७ |
| ३७ | रूपकावली | ... | ४८ |
| ३८ | चुकलेला पांथस्थ | ... | ४९ |
| ३९ | बद्ध जीवास | ... | ५१ |
| ४० | तुझें रूप | ... | ५३ |
| ४१ | झोका | ... | ५४ |
| ४२ | देवास | ... | ५५ |
| ४३ | देवाच्या दारीं | ... | ५६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य
१२९९
ता.
ठाणें.

# मोहर

[ सुनीत ]

उन्मादें सहकार हा डंवरला, डोले नवा मोहर
अर्धोन्मीलित पालवी बहरली, लाली फुले लाजरी
कैसा मत्त सुगंध हा दरवळे, छायाहि चेतोहर
वासंती सुषमा अहा ! विखुरली, सृष्टी नटे हांसरी
वायू ! तूं पसरीं सुगंधलहरी दाहीदिशां भूवरी
भृंगांनो ! मधुगुंजनीं विहरुनी आकंठ सेवा रसा
ये रे ! ये फुलपांखरा ! सुरसिका ! स्वच्छंद क्रीडा करी
स्फूर्तीनें हृदयांतले स्वर तुझे गा कोकिला ! राजसा !

पाहोनी भरदार मोहर परी मोहूं नको मानवा !
सारा मोहर होउनी सफल हा तूंतें कधीं ना मिळे
जाई कांहिं गळूनि, वा करपुनी, कोणीहि तोडील वा
कांहीं आत्मरसीं मुरोनि पिकतीं तीं सेव्य होतीं फळें
आम्रांतील विकासलीं न अजुनी बीजें रसज्ञा ! पुरीं
प्रेमें तूं जरि राखशील, पुढतीं लाभे खरी माधुरी

सोलापूर २८ । ३ । ४१

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६१८८

# श्रीशारदा वंदन.

## जातिः—घनश्याम

स्फूर्तिदायिनी ! महन्मंगले ! भावें तुज वंदन । शारदे
दिव्य सुमंगल तुझ्या दर्शनें आनन्दे मन्मन

चराचरांतिल सौन्दर्याची सगुणमूर्ति तूं खरी । पुण्यमय
ललितकलांतिल प्राणशक्ति तूं सरस्वती साजरी

नवकवनांतिल रसवन्ती तूं देवी वागीश्वरी । दिव्यतर
कविहृदयांतिल प्रतिभाही तूं मंगल माहेश्वरी

संगीतांतिल मंजुलता तूं देवी स्वरसुंदरी । सुकोमल
नाट्यकलेंतिल रंगदेवि तूं अभिनयपरमेश्वरी

मृदुल करानें तार छेडितां घुमतो वीणारव । मदन्तरिं
तव पदकमलीं मिलिन्द करिती मंजुल गुंजारव

मोर नाचती लता डोलती फेर धरिति अम्बरीं । तारका
तरुवर डुलती सुमनें हंसती हर्ष भरे अन्तरीं

विहग गातां समीर गाई सरिताही गातसे । झुळझुळा
अणुरेणूमधिं जणुं वीणारव पडसादचि देतसे

त्या पडसादें त्या मधुनादें मन्मन वेडावलें । शारदे
जड देहातें विसरुनि माते ! तव गानीं रंगलें

भान हरपलें भीपण नुरलें देहभाव लोपला । सर्व मम
आत्मानंदीं कलासमाधीं जीव पुरा गुंगला

चिच्छक्तीचा किरण अवतरे मदीय हृदयान्तरीं । दिव्यतर
त्या तेजांतुनि काव्यशारदा प्रकटे अवनीवरी

सोलापूर १७।१०।१९३४

———

# जिवाची ओळख

## जाति—नवति

नजर ही तुझी    तरल लाजरी
ओसंडित मधुसुषमा    मदिय अंतरीं

वदन वळवुनी    नजर चुकविसी
मूक लपंडाव असा    मजशिं खेळसी

फिरफिरूनि ती    नजर भेटते
मुग्ध तुझ्या नयनांतुनि    हृदय बोलतें

हृदयिं उमलली    प्रीतिची कळी
गालिं तुझ्या पडत पहा    चिमुकली खळी!

लागते जिवा    गोड ओढणी
अननुभूत भावलहरि    उसळती मनीं

तुजसि पाहुनी    वाटतें मनीं
नकळत सी पडत असें    सुखद बंधनीं

मीहि कोठला    तूंहि कोठली
जीवाची ओळख परि    आज जाहली

सोलापूर ४–६–३४

# अंतःपटा आडून.

## जाति—कृष्णदेव.

जरा धीर धरि गे आतां प्रेमले ! मनांत
पहा होइ अंतःपट हा दूर दों क्षणांत

गुंफियलीं हृदयें अपुलीं प्रेमरज्जुनें गे !
मीलनाचिया सीमेसी उभे आज दोघे
मात्र एक अंतःपट हा राहि आपणांत

अधीरता तरि तव किति ही वदनदर्शनासी
मुंडवलीमधुनी तिरपें चोरुनी पहासी
भाविकाल शोधिसि मधुनी काय स्वस्तिकांत ?

उत्सुकतर आनंदानें हृदय फुलुनि येई
मनीं काय खळबळ होई कळेनाच कांहीं
तोंच ' सावधान ' हि होई भोवतीं जनांत

लांबणार कुठवर ऐसा विधी अष्टकांचा
वरुनि शिरीं वर्षाव किती होइ अक्षतांचा
घालणार केंव्हां आतां माळ ही गळयांत ?

बार्शी २८।५।१९३९

# सव्वीस

## जाति—प्रणय प्रभा

चल विहरूं सखे ग ! प्रणयवनीं
हा निसर्ग वालित साद मनीं

वसंत फुलला तारुण्याचा
चांद उगवला मधुपुनवेचा
सागर खवळे उल्हासाचा
प्रीतिची बहरली बाग मनीं

वायू वाही मंद सुमंजुल
मधुर कूजती कोकिल-बुलबुल
राघू मैना करिती गुलगुल
गुजगोष्टी करूं या नवकवनीं

इकडे तिकडे खालीं वरतीं
सुखें पसरलीं अवतींभंवतीं
गोळा करुं या चारीं हातीं
तों सकल लुटूं या चल रमणी !

मराठी ग्रंथ संग्रहालय
८०७
काव्य
९२७१
ता.
ता.

प्रीतीचे ग पंख लावुनी
उन्मादाचें वारें भरुनी
उंच भरारी घेऊं गगनीं
स्वच्छंद बागडूं उडुपगणीं

चंद्रकलेच्या हिंदोळ्यावर
झोके घेऊं उंच भराभर
या क्षितिजाहुनि त्या क्षितिजावर
मग होऊं अनंतीं लीन क्षणीं

सोलापूर ४-१-४०

# रुष्ट सुंदरीस

## जातिः—मनमोहन.

कां राग असा लटका हा दाखविसी सुंदरी ?
तरलता अशी कां नयनीं ?
मुग्धता अशी कां वदनीं ?
दाविते काय गालींची तव कांती लाजरी ?

धडधडे कशानें हृदयीं ?
रोमांचित तनु कां होई ?
चालली सांग कसली ही खळबळ गे अंतरीं

कां धरिसि अबोला सांग ?
हा खराच कां तव राग ?
कीं मला भुरळ घालाया जादुगिरी ही पुरी ?

अधरीं हा कंप कुठोनी ?
कां कटाक्ष हे चोरोनी ?
शोधिसी काय मम नेत्रीं मृगनयने ! बावरी ?

कां अशी पाठमोरी तूं ?
मज कळला गे तव हेतू—
चल येइ सखे सेवाया अधरींची माधुरी

# छकुलीचें चुंबन

## जातिः—घनश्याम

छकुली चिमणी खेळत होती नादांतच आपल्या
'तो' आणिक 'ती' पाहत होतीं मोदभरें लीलया

चिमणी लीला पाहुनि त्यांसीं कौतुक येई भरून
एका वेळिंच परस्परांसी पाहति दोघे हंसून

दोघींच्याही साम्य मुखांतिल तो शोधूं लागला
हिच्या एकदां तिच्या एकदां निरखी मुखमंडला

कन्येच्या मुखिं बिंब बिंबलें कांतेच्या वदनिंचें
तारुण्याचें बालरूप तें विधिच्या नवलाइचें

निराळाच मग कसलासा तरि हर्ष तया जाहला
त्या हर्षाच्या नव्या दृष्टिनें फिरुनी पाही 'ति'ला

अर्थपूर्ण ती नजर रोखुनी तशिच तिच्या लोचनीं
प्रदीर्घ चुंबन घेइ मुलीचें मिष्किलसें हांसुनी

इकडे यानें छकुलीच्या तर ओठ मुखीं टेकले
तिकडे कां मग अर्धांगीचे कपोल हो लाजले ?

सोलापूर ७।८।३७

# विवाहापूर्वी

## जाति—प्रणयप्रभा

म्हण एकदांच तूं ‘ हो ’ मजला
जिव वाहिन माझा हा तुजला

हृदयाच्या या देव्हाऱ्यांत
ठेविन तुजला फुलांफुलांत
कमला देवी जशि कमलांत
संसार थाटुं या चल अपुला

बाह्य जगाचे कटु आघात
झेलिन वरच्यावर हातांत
करिन त्यांसवें मी दों हात
परि रक्षिन नाजुक तव तनुला

चांदरातिच्या मधुसुषमेंत
गच्चीवरतीं बसुनि सुखांत
गुजगोष्टी करुं एकांतांत
मुखिं खुलेल तुझिया चंद्रकला

हौसेसाठीं तूं रुसशील जरि
हट्ट तुझा तो पुरविन झडकरिं
लाजशील तूं मिटल्या अधरीं
खळि पडेल सुंदर तव गाला

खावें प्यावें सुखें फिरावें
मी हंसवावें तूंहि हंसावें
आनंदीआनंदिं रमावें
जग करील हेवा मग अपुला

## विवाहानंतर

### जातिः—शूर्पणखा

संसार पाठिं लागला
गडे हा जीव पुरा भागला

तुम्हि सदाच कामामधीं
वरिं लक्ष असेना कधीं
मुलिं सोबत न मिळे मला

घरकाम पडे कितितरी
ना नोकर एकहि घरीं
कमरेचा काटा ढिला



(१०९

किति सासुबाइ बोलती
त्या वन्संही टोंचती
तुमचीच फूस त्यांजला

कधिं फिरायला जात ना
घरिं वेळ नसे वाचना
ना माहेरिंहि जायला

कधिंचि मी कुड्या मागतें
मजकडे कोण पाहतें ?
जणुं मनच नसे पत्निला !

किति कारटिं रडतीं तरी
कुणि वेड न त्यांना वरी
पाळणा न कधिं थांबला

मज लग्नाआधीं तरी
कां वचनें दिधलीं करीं ?
पुरि कळली पुरुषी कला

कां असें मला हांसतां ?
कां रोखुनिया पाहतां ?
माशि नकाच बोलूं – चला

गडे हा जीव पुरा भागला

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य 1219
मराठी ग्रंथ संग्रहालय
2001

# मूक प्रेम

## जाति:—रसना

दिसतां कधीं कुठें तूं मी एकलें पहावें
हृदयीं तुझें स्वरूप आकंठ साठवावें
परि तें तुला न बाले ! कधिंही मुळीं कळावें
अस्तित्वही तुला गे ! माझें न जाणवावें

दुर्दैवि अन् अपेशी मी हीन दीन एक
दारिद्र्य दुःख कष्ट सोशीतसें अनेक
स्पर्शो जरी तुला हा माझा विदग्ध हात
सौंदर्य कोवळें हें करपेल गे ! क्षणांत

ऐसीच दूर राही मी राहतों असाच
वायाळ होउनि मी पडतों असा इथेंच
माझ्या सुखासुखाची तुजला पडो न चिंता
तुजला सुखीं पहावें ही एक आस चित्ता

तुझियाच चिंतनांत मी सर्वदा रमावें
विसरूनिया जगास तव एक गान गावें
हंसुनी मला जगानें वेडापिसा म्हणावें
मी माझिया मनांत जगता सदा हंसावें

मी एकलाच येथें झुरतों जरी मनांत
विरहांत सौख्य माझें मी भोगितों निवांत

# प्रेमले !

## जातिः—अबला

प्रेमले ! जा मजला विसरून
दों दिवसांचें मनोराज्य तें
गेलें हाय ! विरून

जिवा-जिवांचा गोफ गुंफिला
गेला पीळ सुटून

नकोस पाहूं केविलवाणी
अश्रू घे अवरून

सुमनासम तव हृदय, करी तें
कठिणहि वज्राहून

नामरूप मम टाक पुसोनी
अपुल्या हृदयांतून

पतिसी अपुल्या सुखवी आतां
सतिधर्में वागून

असेल जगतीं पुनर्जन्म तरि
होइल भेट फिरून

कुर्डुवाडी १५।७।३७

# वेडी समजूत

## वृत्तः—चामर

मजपासुनी अतिदूर तूं । नि तसाच मी तुजपासुनी
पुढतीं कधीं सहवास तो । मिळणार ना कटुजीवनीं

जनिं दावितों हंसुनी परी । मज एक ठाउक तें कसें
तुझियाविना दुजिया कुणा । कळणार ना मनिंचें पिसें

मज 'भाउ' तूं म्हणसी जनीं । तुज मीहि 'ताइच' मानितों
लपवूनिया निजभावना । जगतास नाटक दावितों

फसवीन मी जगता, परी । फसवूं कसा निजमानसा
करुं काय गे न कळे मला । तुजला गडे ! विसरूं कसा ?

विसरावयासि परोपरी । हृदयास मी समजावतों
परि सांगु मी कवणा, कसें । वणवाच मन्मनिं पेटतो

सोलापूर २।८।३७

——

# बाल मैत्रिणीस

## जातिः—हिमालय

जाहलें काय काय गडे तुजला ?
आज कां शिष्टपणा सुचला ?

कालची अपुली अपुली भातुकली
नसेलहि अजुनि पुरी सरली

ते तुझे चाळे चाळे लडिवाळ
जाहले धुंद खोडसाळ

शरीरीं येई येइ नवा टॅंच
लोचनीं नवे डावपेंच

होसि कां इतुकी इतुकी उद्दाम
चुकविसी दृष्टी मुद्दाम

महागे मजला मजला तव बोल
हास्य तर झालें बिनमोल

तुझा मी मित्र बालमित्र इतका
आज कां ठरलों ग परका ?

नको अशि होऊं होऊं शिरजोर
कुणीतरि पळविल तुज चोर

# कुणाचा राग कुणावर तरी

## जाति:--केशवकरणी

" सांजहि टळली – अजुनि न कैशी स्वारी आली घरीं
जाहली शर्थ अतां बाइ पुरी "

प्राणसख्याची वाट पाहुनी रमणी कंटाळली
अंतरीं खिन्न असे जाहली

रुसली फुगली चिडली रडली पतिवरि रागावली
थरथरे अधरींची पाकळी

अठी कपाळीं नयनीं लाली भ्रुकुटीही मुरडली
कपोलीं अर्धी लपली खळी

तें मोहक रुसवें वदनकमल देखुनी
हासला चंद्रमा गगनीं आनंदुनी
तें पाहि मानिनी अपुल्या सज्जांतुनी

" खट्याळ मेला चंद्र खिजवितो " म्हणुनि चिडे सुंदरी
कुणाचा राग कुणावर तरी

# ‘ तिकडचें ’ पत्र

## जातिः--चंद्रकला

काय करूं बाई जमेना गाण्याचा सूर
चैन नसे जीवा अंतरीं दाटे हूरहूर

अजुन कसें बाई येइना पत्रहि तिकडून !
कंटाळुन गेलें मी तरी वाट सदा बघुन

अवध्या दों ओळी परी कां ना लिहिल्या त्याहि
इतुका मजवरतीं जाहला राग कसा बाई ?

वाट कुणी पाही तयाची कशी नसे खंत ?
निष्ठुर ही मेली जगामधिं पुरुषांची जात

येऊं देत तरी अशी मी -वरि रागावेन
जुलुम असा यांचा उगीचच सहन करिल कोण ?

पाहुणचार तिथें बैसले मित्रांचा घेत
कीं माझा पडला विसरही तिथल्या सौख्यांत ?

संकट कोसळलें ? कळेना मला तरी बाई
किंवा जीवासी जाहलें कमजास्ती कांहीं ?

छे छे मीच खुळी    बोलतें काय असें भलतें ?
विरही जीवासी    कुशंका वेडिपिशी करते

मेली खंत तरी    करावी किती अशी अजुन
अधीर जीवासी    न होई ताग मुळी सहन

× + ×

वाचुनि कां बाई ?    पत्र कां हृदयाशीं धरलें ?
गेला राग कुठें ?    कपोलीं हास्य कसें फुललें !

पुणें २।१।३७

८०१
आ. क्र. ८५०५ ९२११
ता.
ठाणे

# रंभा

## जातिः—हिमालय

कोण ही रंभा रंभा ही चाले
करित हे खोडसाळ चाळे ?

सावरी पदर पदर उगीचच का
वहाणा करोनिया लटका

मुरडिते माना माना कुर्यात
डोलते अपुल्या नादांत

लाघवी मंद मंद धुंद चाल
धरी जणुं नृत्याचा ताल

गाल कीं गेंद गेंद गुलाबाचे
लोचनीं बाणच मदनाचे

केस भुरभुरती भुरभुरती फार
शेपटा रुळे डौलदार

मुसमुसे तेज तेज यौवनाचें
हास्य तर ओठावर नाचे

परंतू फोल फोलच मजसी ती
तियेला नच ठावी प्रीती !

दादर ५।१।३७

# ओवाळणी

## जातिः--मुद्रिका

ही भाऊबीज भासते कशी मज सुनी
ओवाळणि घालूं कोणा ताइ ! ग तुझ्यावांचुनी !
निरपेक्ष तुझें तें प्रेम कसें विस्मरूं ?
या गहिंवरल्या हृदयाला सांग मी कसें आवरूं !
हृदयांत वसे तव मूर्ति सगुण साजरी
स्मृति कोमल बालपणींच्या या तरंगती अंतरीं
कशि भातुकली खेळलों सुखें तुजसवें
लुटिपुटिचा प्रेमल खाऊ फिरफिरुनि मनीं आठवे
देतांच आइनें जरा खाउ कधिं तुला
दिधलास घास वदनींचा काढुनी ताइ ! तूं मला
मी रुसुनी बसतां कधीं खिन्न होउनी
पुसलेस अश्रु पदरानें पोटाशीं कवटाळुनी
कधिं काउचिऊच्या गोड गोष्टि सांगसी
कधिंकधीं ' श्री-ग-णे-शा ' ही कौतुकें मला शिकवसी
सासरीं जावया निघतां माहेरुनी
' येतें हं भाउ ' म्हणोनी चुंबिलेंस कुरवाळुनी
या आठवणींनीं कंठ पहा दाटतो
मन मोहरुनी अश्रुंचा लोचनीं पूर लोटतो
त्या अश्रुजलाचे मोति करीं घेउनी
घालितों तुला प्रेमानें ताई ! ही ओवाळणी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६१९८

# श्रीमंत पतीची राणी

## जाति :—शूर्पणखा

मी राणी इंद्रायणी
सखे ग हताश हतभागिनी
जरि रूप रतीसारखें
रमणासि न रमवूं शके
अतृप्तचि संमीलनीं

'ते' शोधिति परसुंदरी
चंचला मती भ्रामरी
मी तृषार्त चिरयौवनीं

त्या रंभादिक मेनका
नर्तकी नटी गायिका
सवतीसम सलती मनीं

मी नंदनवनिं विहरतें
परि अरण्य तें भासतें
सुख काय मुकुटभूषणीं ?

मी सुंदरशी बाहुली
जणुं प्रदर्शना मांडिली
स्वर्गाच्या सिंहासनीं

निष्प्रेम मना यातना
कधिं अंत न या जीवना
मृत्युहि न चिरंजीवनीं

# बाळ कुणाचें ?

## – साकी –

आनंदानें संसारामधिं नांदत होते दोघे
प्रीतिपुष्प तें बालक चिमणें सुखमय जीवन अवघें
एके दिवशीं खेळवीत ती बसली घेउनि बाळा
पाहत होता तोहि कौतुकें छकुल्याचा तो चाळा
( अपुली कांता माता बनतां न्यारें कौतुक वाटे
पती आपुला ' बाबा ' बनतां प्रेम निराळें दाटे )
' तूं कोणाचा '? म्हणे विनोदें ती राजस बाळाला
' मी बाबांचा ' म्हणुनी बालक बिलगे झणिं पित्याला
अपुल्यावरतीं डाव उलटतां चिडली बाळावरतीं
' जातीलाची मिळावयाची पुरुषांची ही जाती '!
' अशी काय गे रुससी वेडे ? काय गुन्हा मम यांत ?'
' आहे ठाउक, आतां मजशीं मुळींच बोलूं नकात !'
' बरें बरें तर, तुझाच असुं दे; घे ना गे छकुल्याला '
' नको अम्हांला मुळींच आतां अपुला हा अपुल्याला '
' बरें राहुं दे, दोघांचाही असो आपुला बाळ '
ऐसा झाला ससेट त्यांचा; सारा प्रणयी खेळ
प्रसंगास या काळ लोटुनी जाई जैसा कांहीं
त्या दोघांचा बाळ लाडका प्रभुधामासी जाई
' बाळ कुणाचें ? बाळ कुणाचें ? बालक हें कोणाचें ?'
' तुझें नि माझें दोघांचेंहि न केवळ देवाजीचें ! '

# मुके अश्रू

[ एक अविवाहित माता आपल्या पोटच्या गोळ्याला अंधाऱ्या रात्री दूर रानांत सोडून परत येत आहे ]

## जातिः—अक्रूर

तुज टाकुनिया निघतें मी वेल्हाळा । सुखि राही माझ्या बाळा

बघ चोहिंकडे रातकिडे किरकिरती । अंधार दाटला भंवतीं
तीं दूरवरी घुबडें घूं घूं करिती । भेसूर भेक ओरडती
ती टिटवि कशी शब्द करी अपशकुनी । पिंगळेहि वदती मधुनी

या काळया अपरात्रीला
फळ आलें मम पापाला
तव जन्म राजसा झाला

दुर्दैवच रे घाली निष्ठुर घाला । सुखि राही माझ्या बाळा

दों घटकांचा चिमणा माझा बाळ । कापिली न अजुनी नाळ
किति गोड सख्या रूप तुझें रेखीव । लाडका चिमुकला जीव
जरि फुलाहुनी कोमल ही तव काया । तेलपाणि नच लावाया

हा वारा तुज बाधेल
थंडीही तुज वाजेल
दृष्ट वा तुला लागेल
परि मायेचें पांघरूण ना तुजला । सुखि राही माझ्या बाळा

तुजपासुनिया निघतें मी परताया । जाववे न परि मम पायां
तुज सुकुमारा ! वाटे जवळीं घ्यावें । घट्ट उरीं कवटाळावें
तव वदनाचा एक मुका तरि घ्यावा । पान्हा हा तुज पाजावा
परि काय करूं रे राया !
मायाही उघड कराया
लागतें भाग्य जगतीं या !
मातृत्वचि हें लाजिरवाणें मजला । सुखि राही माझ्या बाळा

तूं किती जरी खेळशील, हंसशील । परि कौतुक कोण करील ?
वदशील जरी गोड बोबडे बोल । कोणास तयाचें मोल ?
रमणीय तुझ्या बालपणींच्या लीला । मी नसेन पाहायाला !
मी दूर कुठें राहीन
रात्रंदिन तुज अठवीन
एकांतिं अश्रु ढाळीन
तव कल्याणा आळवीन देवाला । सुखि राही माझ्या बाळा

रडुं नको असा जन जागे होतील । तव जन्म तयां समजेल
मजसाठिं तुझा छळ छकुल्या! होईल । धिक्कार सदा करतील
निष्पाप जरी तूं सखया असलासी । तरि त्याचें काय जगासी ?

अपराधी पापी मीच !
मायावि घातकी मीच !!
सर्वस्वीं स्वार्थी नीच !!!

तूं थोर मनें क्षमा करी रे मजला । सुखि राही माझ्या बाळा

तुजलागिं नसे अपुला कोणी भंवतीं । एकला तुझा तूं जगतीं
मी माय तुझी म्हणते जरि तुजपाशीं । तरि सांगूं केविं जगासी
ते तात तुझे जरि तुजला बघतील । ओळखही नच देतील

ही रीतच सारी न्यारी
सारें हें जग व्यवहारी
तूं पोरकाच संसारीं

तरि जपुनि रहा दांभिक या जगताला । सुखि राही माझ्या बाळा

जरि नाहिं कुणीं लालनपालन केलें । मायेनें नच वाढविलें
जरि नाहिं कुणीं दिधला तुजला वाव । कर्णापरि काढी नांव
तव नांवानें कृतार्थ मी होईन । दुःखकष्ट मम विसरीन

शेवटचें सांगें तुजला
विसरूं नको मम वचनाला
जरि जन्म पुन्हा तुज आला

कधिं येउं नको पापिणिच्या पोटाला। सुखि राही माझ्या बाळा

तुज टाकुनिया निघतें मी वेल्हाळा। सुखि राही माझ्या बाळा

सोलापूर ३-१-३६

★ ★

# चित्रकार

## अनुष्टुभ

सायंकालीन ती वेळ सोनेरी सृष्टि जाहली
गारसा सुटला वारा रम्यता जगिं पातली
सज्जामध्यें उभी होती कामिनी कुणि सुंदरा
मार्गामध्यें उभा होता चित्रकार खराखुरा
आपुल्या प्राणनाथाची प्रतीक्षा सुंदरी करी
वाटेस लागले डोळे उत्कंठा वदनावरी
कठड्यावरती हात लवलेली पुढें जरा
बांधा नीटस रेखीव चेहरा लव लाजरा
वाऱ्यानें उडती केस आला पदर खालतीं
वेणींत खोविलें फूल विधिची रम्य ती कृती
चित्रकार म्हणे चित्तीं 'आहे विषय सुंदर
कलेलाही असे वाव चित्र रेखाटुंया तर !'
सौंदर्यान्वेषिणी दृष्टी कलासक्तच केवळ
निरीक्षण करी सूक्ष्म परी निष्पाप निर्मळ
सजीव चित्र तें गोड पाही निश्चल लोचनीं
प्रतिबिंब पडे त्याचें त्याच्या मानसदर्पणीं
उभा तो भर रस्त्यांत निस्तब्ध पुतळ्यापरी
भोवतीं जमले लोक भान त्याला नसे परी
एकाग्र लोचनें त्याचीं खिळलीं सुंदरीवरी
म्हणती जन हासोनी 'वेडा आहे कुणीतरी?'

# मुरली

## जातिः—मनमोहन

थांबीव अतां गोविन्दा मधुर तुझी बांसरी
तव गाना मन हें विटलें
ऐकुनी कान मम किटले
अरसिका काय व्हावी ही मुरलीची माधुरी ?
रंगलें चराचर गानीं
गौळणी गुंगल्या रानीं
मोहिनी तुझ्या मुरलीची झणिं सखया आवरी
द्वापारापासुनि कान्हा
मुरलीच्या घेसी ताना
तरि अजुनीही न कसा तूं शिणशासी श्रीहरी ?
लागला कवींना छंद
मुरलिचें माजलें बंड
मुरलीमय कविता झाली बघ आतां तूं तरी !
हरपलें भान राधेचें
विरघळलें हृदय कवींचें
तुजवीण कोण वा त्यासी आणिल ताऽऽळयावरी ?
अधरिंची वेणु काढोनी
दे यमुनेमधिं फेकोनी
होईल बंद मग सारी काव्यांची फॅक्टरी !

# कोळिष्टकांत अडकलेल्या भ्रमरास

## वृत्तः—वसन्ततिलका

कोळिष्टकीं मधुकरा ! पडलासि हाय
साहीहि पाय रुतले, थकले उपाय
काळा सुनील चमके तव गोड रंग
तें गूढ–गुंजन तुझें करि चित्त दंग

ती वर्तुलाकृति गती रुचिरा त्वदीय
हा हन्त ! काय तव ही स्थिति शोचनीय
त्या पाहिल्यास कलिका सुकती बिचाऱ्या
त्वच्चुंबनाविण कशा फुलतील साऱ्या ?

पुष्पांतला हळुंच तूं मकरंद घ्यावा
त्याचा फुलासहि परी नलगे सुगावा
ऐसा पटाइत खरा असुनीहि चोर
केलीस चूक कशि रे इतुकी अघोर ?

सारे कविव्रज सदा तुज वर्णिताती
सारज्ञ तूं रसिक तूं तव गूण गाती
तेणें भ्रमोनि भ्रमरा ! फुगलासि फार
धुंदींत त्या बसरुनी पडलासि ठार

तूं खांब पोखरिसि ना अमुच्या घराचे ?
ऐसेंच शासन तुला मग व्हावयाचें !

---

# पाऊस

## जातिः—भाऊबीज

काळ्यानिळ्या आकाशांत
मेघ आले संथ संथ
पाऊस पडे अंगणांत
झिम् झिम् झिम्

कोठें गेल्या चंद्र-तारा ?
लपंडाव चाले सारा
गार गार वाहे वारा
सुंई सुंई सुंई

झाडें वेलीं डोलताती
गडगड मेघ करिती
विजा कैशा नाचताती
चम् चम् चम्

गंमत ही सारी बघुनी
मौज किती वाटे मनीं
वाजवूं या आपण मिळुनी
टुण् टुण् टुण्

———

# कारभारी गेले गावा

## [ ओवी ]

कारभारी गेले गावा
जीवाला ग करमेना
दिवसही ओसरेना
काय करूं ?

दीस जाई कसाबसा
रात परी ओसरेना
डोळा डोळिया लागेना
कांहीं केल्या

जरा कुठें झोप येतां
येई सखा सपनांत
चावळोनि जागी होत
पुन्हा पुन्हा

बसतें मी पानावरी
भाकरच नाहीं जात
कालवतें काळजांत
दिसभरी

उचकीहि लागे किती
काढतात आठवण
मुकी भाषा बोलें मन
पिरतीची

कधीं आतां येणार ग !
मन झालं येडं पिसं
जीव झाला कासाविस
सख्याविना

येऊं देत लवकर
पात्र अंबे ! नवसाला
येईन मी दर्सनाला
पतिसंगं

———

# रानफूल

## जातिः—केशवकरणी

सखे साजणी जरा हासुनी कौल झनीं दे मला
जीव ह्यो येडा बग जाहला

तुज्या अंगच्या जवानिचा ग फुलला बग मोहर
तांबडं फुटलं ओटावर

हळूंच हसतां दात पांडरं ओटांतुन चमकती
मक्याचं दानं जनुं सोभती

काळं कुरळं केस तुझं ह्ये पाठीवर पसरती
वडाच्या पारंब्या लोंबती

ह्ये गाल लाजती जनुं लाजाळूपरी
ही हिरवी टिकली गोंदियली त्यावरी
ह्यो भांग वाकडा पाउलवाटेपरी

चंचल नाजुक चुनचुनीत तूं दिससी खारीपरी
खेळकर अल्लड आन् बावरी

खुरप्यावानी भुवया तर या काळजास कापती
टपोरं डोळं ह्ये चमकती

मावळतीच्या सुर्व्यावानी कुकू कपाळावर
नाकही सरळ तुझं सुंदर

कबूतरापिर मान तुझी ही ऐटिमधीं डोलती
गोड ही चिंचोळी हनवटी

कोकिळऽवानि ग गोड तुझा ह्यो गळा
साळुंकिवानि ह्यो रंग तुझा सावळा
जनुं मोरावानी डौल तुझा आगळा

रानफूल ह्यें हतं येकलं उजाड माळावर
गुलाबा येइ न त्याची सर

डोणगांव २१-२-३७

---

# पेरणी

चला तिप्पन धरुन बिगीबिगी पेरनी करुंया
झाली जिमिन नांगरून
गेला मिरिग येऊन
आतां वखूत न्हाइं दवडाया ॥ चला तिप्पन०

वापं झालं तयार
भुइ काळी भिंगार
भुसभुशीत लागे पाया ॥ चला तिप्पन०

माझी बैलं खरी
हिऱ्यामाणक्या परी
जोडि गावांत न्हाइ अशि समद्या ॥ चला तिप्पन०

आतां होइल पेरून
पाऊस येइल वरून
शेत पिकानं भरऽल राया ॥ चला तिप्पन०

येका बियावरी
दानं खंडीवारी
काळ्या आईचि संमदी माया ॥ चला तिप्पन

कष्ट आपल्या हातीं
फळ देवा हातीं
त्येच्या किर्पेचि वाट बगूं या ॥ चला तिप्पन०

---

# धर्मवीराः ।

## अनुष्टुप छंदः ।

आदौ योगीश्वरः कृष्णः स्मृतिकर्ता मनुस्तथा
शंकराचार्य आद्यश्च विद्यारण्यो महामुनिः

सद्गुरुर्नानकः शीखः प्रतापश्च प्रतापवान्
समर्थो रामदासश्च जगन्नाथश्च पण्डितः

शिवश्छत्रपती राजा चिमाजिर्वीरपुंगवः
विवेकानन्द आर्यश्च दयानन्दसरस्वतिः

लोकमान्यश्च तिलको मालवीयश्च पण्डितः
श्रद्धानन्दो हुतात्मा च नृसिंहो लेखनीपतिः

धर्मात्मा परमानन्दो मुंजे च नरकेसरी
महर्षिः कुर्तकोटिश्च क्रान्तिवीरो विनायकः

पुण्यश्लोकानिमान्सर्वान् धर्मवीरान् महात्मनः
बन्दते स्फूर्तिप्रालब्धुम् भक्त्या गंगाधरः कविः

सोलापूर ८–९–३८

———

# शिवाजीस

## वृत्तः–लघुमंदारमाला

कृष्णापरी धोरणी थोर मंत्री योद्धा रणामाजि पार्थापरी
रामापरी न्याय निःपक्षपाती औदार्य कर्णापरी अंतरीं ॥
इंद्रापरी थोर सत्ता दिगंतीं वैराग्य चित्तीं विदेह्यापरी
हातीं कुबेरापरी दिव्य लक्ष्मी वाचस्पतीतुल्य वागीश्वरी ॥१॥

प्रल्हादबाळापरी गाढ भक्ती कार्यी ध्रुवासारखी निश्चिती
भीमापरी शक्ति अंगीं प्रचंड नम्र स्वभावें जणूं मारुती ॥
कामावरी क्रोध सारा मनींचा लोभासवें सर्वथा मत्सर
गर्वासवें दाविसी दंभ लोकीं ऐसा खरा राजयोगीश्वर ॥२॥

ओतून सद्‌गुण सारे जगींचे मूर्ती प्रभूनें तुझी निर्मिली
पुण्याइ सारी जणूं हिंदभूची साकार रूपें तुझ्या जाहली
ठेचून औरंग झोटिंगशाही हिंदुत्व तूं रक्षिलें संगरीं
माझ्या महाराष्ट्रस्वातंत्र्य–सूर्या ! कीर्ती प्रकाशे तुझी अंबरीं
॥ ३ ॥

पंढरपूर ३–५–३५

---

# सुवर्णभूमी

## जातिः—मोहिनीमिश्र

ती हीच काय हो सुवर्णभूमी अपुली ?

जिथें शूर शिवरायानें फुंकिली तुतारी
जिथें उंच जरिपटक्यानें मारिली भरारी
फडफडला भगवा झेंडा स्वर्गिच्या शिवारीं
तिथें आज परवशतेची खिन्नताच काळी ॥१॥

शीखांच्या समशेरींचा नाच जिथें चाले
धनुर्बाण रजपूतांचे रिपुरुधिरें न्हाले
जिथें मर्द मावळियांचे चमचमले भाले
तिथें पहा लाठीलाही बंदि असे झाली ॥२॥

जिथें वेदवाणी स्फुरली महातपस्व्यांची
दुमदुमली गीता मुरली जिथें श्रीहरीची
जिथें संतवाणी घुमली तुका—समर्थांची
तिथें आज गाजवि सत्ता संस्कृती निराळी ॥३॥

माउली म्हणोनि जगानें वंदिलें जियेसी
पुरविलें जिनें जगतासी अन्न खावयासी
ठावही दिला वसतीसी, वस्त्र ल्यावयासी
तिला आज माध्याह्नाची भ्रांत हाय ! झाली ॥४॥

निजवैभव पूर्वींचें तें आठवतां सारें
मुखीं दीर्घ निश्वासाचे येति हे फवारे
पोटिं कालवें दुःखानें, नयनिं जल तरारें
भाग्यरवी येइल केव्हां फिरुनि उदयशैलीं ? ॥५॥

सोलापूर ७।८।१९३६

---

# हुतात्मे

## – फटका –

शिवरायाचा सिंह निमाला सिंहगडावरि तानाजी
घोडखिंडिमधिं प्राण देइ बळि स्वामी साठीं प्रभुबाजी

धडेंचि लढला मर्द मराठा मुरारबाजी पुरंदरीं
संभाजीनें धर्मासाठीं प्राण अर्पिला तुळापुरीं

अजमीरींचा धनुर्धारि तो पृथ्वीराजा महशूर
अष्ट्यावरतीं लढुनी पडला बापु गोखला रणशूर

विश्वासाचा झेंडा फडके पानिपताच्या मैदानीं
महाराष्ट्रिचा बम्मनबच्चा भाउ सदाशिव मर्दानी

मेवाडींचें युद्ध टळाया विष प्राशिलें कृष्णेनें
स्वामीसाठीं चिमणा चिलया बळी घातला पन्नेनें

अब्रूसाठीं शीलासाठीं करी पद्मिनी जोहार
झांशीवाली समरसुंदरी लक्ष्मीबाई झुंजार

असे हुतात्मे कितीक झाले अपुल्या हिंदुस्थानांत
कित्येकांचीं नामेंही नच सांपडती इतिहासांत

मंदिराचिया पायांमधले चिरे न दिसती कवणांतें
त्यांवरतिंच परि शिखर शेवटीं चमकत उंच उभें असतें

यशवंतांचें कौतुक गायन करितें जग अभिमानानें
परि धाराहत नरवीरांसी विसरुनि जातें काळानें

देशासाठीं राष्ट्रासाठीं धर्मासाठीं ते लढले
निजरक्ताचें अर्घ्य अर्पुनी धारातीर्थामधिं पडले

पडले म्हणुनी शौर्य तयांचें कोण कबूल न करणार ?
कोण तयांचें नाम ऐकतां मान न अपुली लवणार ?

गेला त्यांचा देह परंतू आत्मा जगतीं अविनाशी
असेल आजहि शोधित अपुल्या हारपलेल्या श्रेयासी

विजापूर ११-१२-३४

मराठी ग्रंथ संग्रहालय
मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. ठाणे

# भगव्या झेंड्यास

## वृत्तः—शार्दूलवि.

किल्ल्यांच्या बुरुजांवरी ध्वजवरा ! होतासि तूं डोलत
केलें राष्ट्र समस्त तूं निशिदिनीं आन्दोलनें जागृत
वीरांच्या समशेरिंचें तुजपुढें चाले सदा नर्तन
उत्साहें स्फुरती मराठगडि ते त्वद्गर्जना ऐकुन
वीरांचे मुजरे तुवां कितितरी स्वीकारिलें हांसत
हिंदुस्थानभरी तुझा जय सदा होता ध्वजा ! गाजत

आतां मात्र मलूल होउनि इथें देवालयाच्या शिरीं
पूर्वींच्या निजवैभवा स्मरुनियां तूं स्फुंदसी अंतरीं
गेलें तें अपुलें स्वराज्य सखया ! स्वातंत्र्य तें संपलें !
गेला तो अभिमान, तेज नुरलें, ऐश्वर्य तें लोपलें
आतां तूं कितिही जरी फडकसी कोणी न तूतें पुसे
दैवा देउनि दोष तूं युगभरीं राही इथें भारसें

पूर्वीं जो ध्वज वैभवें विलसला तो आज आक्रंदतो
'कालाची करणी अगम्य म्हणुनी कालास त्या वंदितों'

सोलापूर ९-१०-३२

# आमची संस्कृती

## जातिः—कोकिळा

'अमुची संस्कृति' म्हणुन बंधुनों पढतां काय अजून ?
तत्त्व तयांतिल कधींच गेलें नेत्र पहा उघडून

वेद चालले पश्चिम प्रांतीं
शोधबोध ते परके घेती
परंतु तुम्ही रितेच जगतीं
शब्दांचीं कां शवें घोकितां माना हलहलवून

स्वैपाकघरीं धर्म कोंडला
तंत्रामध्यें मंत्र बुडाला
संबळिमध्यें देव झाकला
योगेश्वर श्रीकृष्ण बसविला तमाशांत नेऊन

कसेंहि गुरुचें असो आचरण
तोच समजतां हरिनारायण
तीर्थ तयाचें करितां प्राशन
बुवाबाजिचें बंड माजलें गांवागांवांतून

विधवेचा अपशकुन भोवतो
अस्पृश्याचा विटाळ होतो
परक्या अन्नें धर्म बाटतो
पोटामाजीं धर्म असेना, हृदय पहा उकलून

निःक्षत्रिय जग विप्रें केलें
भीष्मद्रोणकृपादिक लढले
बाजीरावें देश जिंकिले
रक्त पाहतां तुम्हीं पडतां डोळे वर फिरवून

धक्काबुकीचा जगीं मामला
बळी जिंकितो नामर्दाला
कोण जाणतो सहिष्णुतेला ?
पहा भोवतीं; आतां तरि घ्या कासोटा अवळून

तुका म्हणे कीं ‘ उगें रहावें
जें जें होईं निमुट पहावें ’
तुम्हांला कां हेंच रुचावें ?
‘ चळवाळिचें सामर्थ्य ’ सांगतो समर्थ हाकारून

‘ पूर्वज अमुचे थोर जगांत ’
फोल मिरवितां प्रौढी यांत !
कितपत तुम्हीं स्वतां अहांत ?
चुकलें अपुलें कुठें पहा तें; जागे व्हा समजून

नाशिक २६-१२-२६

———

# शेतकरी

## वृत्तः—मंदाक्रांता

माध्यान्हासी रखरखतसे तापला सूर्य डोई
येती वाफा धरणिमधुनी, कोरडा कंठ होई
अंगालागीं बसति चटके, साउली एक नाहीं
ऐशावेळीं हलधर कसा नांगरी शेत पाहीं

अंगीं त्याच्या धड न कुडतें, नाहिं पायांत कांहीं
घामामाजीं निथळत उभा, खालुनी भूमि दाही
नाहीं पर्वा लवभरि तया पावसाची उनाची
'माझ्या बैला' म्हणत वदनीं गाइ गाणीं सुखाचीं

पर्जन्याची मुळिं न पुढतीं शाश्वती सर्वकाळीं
वृष्टी कांहीं नियमित नसे, होइ वेळींअवेळीं
येवो किंवा नचहि पुढतीं पीक येवो घरासी
कष्टामाजीं कसुर करणें नाहिं ठावें तयासी

शेतामाजीं श्रमचि करणें त्याचिया मात्र हातीं
ठेवी निष्ठा प्रभुवरि फला-साठिं तो नित्य चित्तीं
त्याची ऐसी कडक बघुनी ही तपस्या उनांत
वाटे मातें कृषिवल खरा कर्मयोगी जगांत

———

# धन आणि चिंता

## — अभंग —

कर्जबाजाऱ्यासी चिंता रात्रंदिन
' कधीं मी होईन ऋणमुक्त ? '

ऋण जाउनिया मिळूं लागे पैसा
म्हणे ' पोटा कैसा पुरेल हा ? '

पुरे ज्यासी धन त्यासी चिंता एक
पडेल शिल्लक कधीं माझी ?

शिल्लकही ज्यासी असे जरा कांहीं
म्हणे ' केधवां ही वाढे आतां ? '

वाढली संपत्ती असे जयापासी
म्हणे ' आतां कैसी टिकेल ही ? '

टिके ज्याचें धन झुरे तो मनांत
' माझिया पश्चात काय होई ? '

मिळो धन कोणा कधींही कितीही
जिवाची चिंता ही सुटेनाच !

सोलापूर २०-१०-३६

—

# द्रव्याविण

## वृत्तः—शार्दूलवि.

खाया भाकर, राहण्यास कुटिका, खादी पुरे ल्यावया
माझें हें गरिबींतलें सुख नसे वाड्यास राजाचिया
लक्ष्मी ! चंचल बालिके ! मजवरी घालूं नको मोहिनी
खोट्या दांभिक वैभवास तव मी जाणार ना भाळुनी
धुंदी आणित लोचनां सधनता जैशी जनां वारुणी
मारी माणुसकी, क्षमा, सदयता ! लक्ष्मी खरी दुर्गुणी
माझी दिव्य सरस्वती करितसे प्रेमें कृपा जोंवरीं
आहे काय जगांत न्यून मजला ? संतृप्त मी अंतरीं

' मी पायां पडतों कृपा करुन द्या पै-पाव आणा मला
बाळें चार घरीं उपाशिं रडतीं कांहीं नसे खायला '
ऐसा हंबरुनी मला विनवितो माझाच हा बांधव
होई पाहुनिया तयास हृदयीं ही कालवाकालव
द्याया त्यास परी नसेच जवळीं पैसा मुळीं तांबडा
तेणें व्याकुळ जाहलों अधिक मी– भांबावलों बापडा
'नाहीं' त्यास म्हणावयास उचले जिव्हा न माझी मुळीं
तैसा मूकपणें पुढें सरकतों मी मंदशा पाउलीं

माझ्यासाठिं मला विषाद लवही वाटे न द्रव्याविण
नाहीं होत परोपकार म्हणुनी व्याकूळ माझें मन

———

# संपादकास–

## – दिंडी –

काव्य जरि तूं ‘ साभार परत ’ केलें
तरी त्याचें ना मोल कमीं झालें

काव्य जेव्हां तें जाहलें लिहून
मिळुन गेलें तेव्हांच समाधान

करा कौतुक वा नका करूं आतां
मला त्याची कांहींहि नसे चिंता

अप्रकाशित आजन्म राहिलों मी
तरी राहिन एकांत सुखीं धामीं

असे भाषा जोंवरी मराठी ही
रसिक भेटेलच कधींही कुणीही

नाहिं कवितेस्तव व्यथित होत जीव
रसिकतेची परि येइ तुझ्या कींव !

सोलापूर २९।९।१९३७

---

# रूपकावलि

## – दोहा –

१ ठेंचः—

कां सखया ! तूं विव्हळसी लागे म्हणुनी ठेंच
पडे वाकुडें पाउल तरि फल लाभे जगिं हेंच

२ संक्रांतः—

म्हणे मुखें कुणि ' मधु बोला घेउनिया तिळगूळ '
परी तर्पणा सिद्ध सदा घेउनि तिलतांदूळ

३ हरणासः—

वातावरणीं मधुर घुमे व्याधाचें संगीत
भुलूं नको परि हरणा रे ! जाणुनि ये इंगीत

४ समुद्राचें पाणीः—

सागरिंचें जल दिसें जरी सुंदर धवल अपार
नयनांचें सुख केवल तें-- नाहिं तृषा शमणार

५ प्रेमभंगानें रडणारासः—

मायेचाही जिथें नरा ! पुरा न लागे थांग
अनाद्यन्त तें ब्रह्म कसें कळेल तुजला, सांग ?

———

# चुकलेला पांथस्थ

## जातिः—उषा

कुठवर हें माळरान आक्रमूं कळेना
चालुनिया शिणलों परि मार्ग ओसरेना।

भोंवतालिं जग निर्जन
रखरखतें वरती ऊन
परि कोठें वृक्षही न
दाह हा शमेना

सहचर जे कांहिं होति
तेहि त्वरें निघुनि जाति
एकलाच मी अंतीं
मार्ग सांपडेना

जों जों पथ आक्रमीत
क्षितिज तसें दूर पळत
कंठ अती शुष्क होत
जल कुठें मिळेना।

ठाइं ठाइं ठेंचाळत
पथिं कंटक रोधितात
घर्मधार भालिं गळत
काळ कंठवेना।

तरुछाया मिळतां लव
सुख निर्भर होइ जीव
परि बघुनी माळ सर्व
तेंहि सुख रुचेना

अति व्याकुळ जीव होत
विश्व सर्व शून्य दिसत
नैराश्यें हृदय जळत
ईशही वळेना

कुठवर हें माळरान आक्रमूं कळेना

गाणगापूर ८–५–३२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ६७९८
(स्थळ प्रत)

# बद्ध जीवास

जातिः—बालानंद

चल रे जीवा पुढें पुढें
विश्वाच्या या पलीकडे

विश्रांतीचें माहेर
सर्वांचें जें निरंतर

जें न दिसे या नयनांसी
केवळ समजे हृदयासी

किरण न पोंचे रविचाही
जेथें वायू नच वाही

नरनारी हा भेद नसे
केवलरूपच एक वसे

नाहिं विकार
शून्याकार

चल रे जीवा जाउं तिथें
नको यावया फिरुनि इथें

आशा आणि निराशाही
जेथें जीवा लव नाहीं

हर्ष नसे वा शोक नसे
समाधान तें एक असे

मायापाशहि जेथ नसे
अनिर्बंध स्वातंत्र्य वसे

उच्चनीचता जेथ नसे
समता केवल नांदतसे

येणें जाणें
वणवण फिरणें

यातायात न उरे जिथें
चल रे जीवा राहुं तिथें

सोलापूर ४।१२।१९४०

——

# तुझें रूप

## — अभंग —

आढळें जीवन जें कां जीवनांत
सत्त्व जें अज्ञांत तेंही तुझें

महाकालामाजीं सातत्य जें वसें
सूर्यामाजीं दिसें तेज तुझें

तारामंडळाची आखीव योजना
वायूची प्रेरणा तीही तुझी

खोली सागराची उंची आकाशाची
चारुता चंद्राची तीही तुझी

वसंतांत सारा भरला उल्हास
पर्जन्यीं विकास तोही तुझा

प्राणिमात्रामाजीं देह जगवीत
वसे प्राणज्योत तीही तुझी

अणुरेणु हाले विश्व सर्व डुलें
चराचर खेळें आपणाशीं

साऱ्या चराचरीं चैतन्य भरलें
तुझेंच दिसलें प्रभो ! रूप

——

# झोका

## — अभंग —

आपुला आपण हिंदोळा बांधला
त्यावरी बैसला कोणी एक
वाऱ्यासंगें नाचे तरुसंगें डोले
आनंदानें खेळे झोक्यावरी
उंच झोका जातां हर्ष भरे त्यासी
वाटे आकाशासी हात लावूं
अधिकच वेगें वर चढविला
उन्माद चढला मनामाजीं
झोका उंच गेला आकाशा भिडला
अनावर झाला तयेवेळीं
डोळयांसी दिसेना शक्तीही चालेना
थांबवितां येना तयालागीं
श्वास कोंदाटला भांबावुनि गेला
कासाविस झाला जीव मग
तोल सुटतांच खालीं उभा काळ
देखुनिया बाळ मनीं भ्याला
वाढती आकांक्षा उंच उंच जातां
मग आवरितां येई कोणा ?

———

# देवास

## - अभंग -

आतां माझी मज मना वाटे लाज
किती वेळां तूज बाहूं देवा ?

मारितांच हांक वारिसी संकट
तरी घेतों हट्ट फिरुनी मी

माझीं न संकटें संपती कधींही
जीवनकलहीं चक्रव्यूह

माझ्या दुःखास्तव तुला कां सायास ?
कुठवर त्रास देऊं तुज ?

नको वारंवार तुजसी बाहणें
नको कष्ट देणें माझ्यास्तव

पडोत मस्तकीं संकटांच्या राशी
सोसेन मी त्यांसी शांतपणें

तरी एवढाच वर देईं आतां
सहनशीलता वाढो माझी

बार्शी २१-६-३७

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६९९८
शाखा

# देवाच्या दारीं

## वृत्त:—श्यामला

आलों प्रभो ! मी दर्शना     कां झांकिसी तूं लोचनां ?

कीर्ती प्रिया वा कांचना     कांहीं न माझी याचना
ती याचकाची वासना     स्पर्शे न देवा ! मन्मना

हातीं करोनी चाकरी     खातों मिळे ती भाकरी
तृप्ती मदीया अंतरीं     कांहीं न चित्तीं कामना

संसारसिंधूवादळीं     नौका सदा आंदोलते
काहूर चित्तीं दाटतें     होती जिवाला यातना

ध्येया बघोनी धांवतों     मोहा बघोनी थांबतों
ऐसा सदा भांबावतों     कांहीं न धावे कल्पना

माझा जगीं या तूं सखा     कोणी न तूझ्यासारखा
होसी जरी तूं पारखा     सांगूं कुणाला भावना ?

मानापमाना टाकुनी     गूढें जिवाचीं सोडुनी
दुःखासुखाचीं बोलणीं     बोलूं कुणाशीं ? सांग ना

आतां कसा रे हांससी     सप्रेम दृष्टीं पाहसी
आनंद दाटे मानसीं     चैतन्य लाभे जीवना

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
८०७

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. १२०५
ता. १२९१

REFBK-0006198
REFBK-0006198